## अपील क्र. मुमाआ/नो.क्र.२२८३/२४/अ.क्र.२४८/२५

अपिलार्थी श्री. रेगी पिटर डायस
एच नं. ३१, कलिना, १ ला मजला,
कलिना व्हिलेज, सांताक्रुझ (पू.), मुंबई – ४०० ०२९.

**सुनावणी दिनांक : २०.०३.२०२५ (In continuation of order dt.25.02.2025)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित. |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

दि.२५.०२.२०२५ रोजी सुनावणीच्या वेळी अपीलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी एच/पूर्व विभाग श्रीमती सना सिद्दीकी उपस्थित होत्या. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी यांनी आयोगास सादर केले की, जन माहिती अधिकारी यांनी दि.११.०१.२०२४ रोजी RETMS विषयी दिलेली माहिती चूकीची असून सदर विचारलेली माहिती ही संकेतस्थळावर उपलब्ध नाही.

दि.२५.०२.२०२५ रोजी सुनावणीच्या वेळी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी एच/पूर्व विभाग श्रीमती सना सिद्दीकी यांनी आयोगास सादर केले की, अपीलार्थी यांचा माहिती अर्ज जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) एच/पूर्व विभाग या कार्यालयाशी संबंधित असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (३) नुसार वर्ग करण्यात आला आहे. तरी सदर माहिती ही सहाय्यक अभियंता (इ. व का.) एच/पूर्व विभाग यांच्याशी संबंधित आहे.

अभिलेखावरुन असे दिसून आले की, द्वितीय अपीलाच्या सुनावणीची नोटीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) एच/पूर्व विभाग यांना निर्गमित करण्यात आली नव्हती. त्यामुळे या प्रकरणी कोणतेही आदेश पारित करण्यापूर्वी संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक आहे.

सबब, आयोगाने या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारींचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक असल्यामुळे दि.२०-०३-२०२५ रोजी पुर्नसुनावणी घेण्यात येईल असे आदेश पारित केले होते.

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि.१५.०४.२०२४ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारींनी माहिती दिली नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांचा अर्ज दि.०३-१०-२०२३ अन्वये "Kindly provide signed and stamped copy of information and reply point wise. (a) Provide the action taken report on my complaint. (b) Provide the details move-ment of my complain, from table to

table. (c) Provide the time involved at each table and dispatch details. (d) Provide details of present location of the complaint file. (c) Provide details of reply to the complainant याबाबत माहितीची मागणी केलेली आहे.

आजच्या पुर्नसुनावणीस अपिलार्थी कोणतीही पूर्वसूचना न देता अनुपस्थित आहेत. विद्यमान व तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) एच/पूर्व उपस्थित आहेत.

तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) एच/पूर्व यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थीचा माहिती अर्ज प्राप्त झाला नव्हता परंतु प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त एच/पूर्व विभाग यांच्या दि.०४-१२-२०२३ च्या आदेशानुसार दि.११-०१-२०२४ च्या पत्रान्वये अपिलार्थीस अभिलेखावरील उपलब्ध माहिती दिली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारींनी अपिलार्थीस माहिती दिली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

(डॉ.प्रदीप व्यास)
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २८.०३.२०२५**